## जिल्हाधिकारी कार्यालय(पुरवठा विभाग) महात्मा गांधी पुतळया जवळ, विकास भवन चे मागे सिव्हील लाईन ,वर्धा ४४२००१

दुरध्वनी क्रमांक(०७१५२) -२४३३१४ ई-मेल dsowar१२३@gmail.com

क्रमांक कक्ष - /कलि/पुरवठा/बारदाना/कावी/131 /२०१६ दिनांक १० फेब्रुवारी,२०१६

### जाहीरात

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे करिता व वतीने जिल्हाधिकारी,वर्धा यांचे कडुन वर्धा जिल्हयातील शासकीय गोदामातील उपयोगी,निरुपयोगी व तुकडा बारदाना विक्रीसाठी इच्छुक निवीदा धारकाकडुन मोहरबंद निवीदा मागविण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्र मिळण्याचा कालावधी व ठिकाण | :- | निविदा फॉर्म १)www.wardha.nic.in २)dsowar१२३@gmail.com या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेता येईल. |
| २ | निवीदा प्रपत्र भरुन देण्याची अंतीम तारीख | :- | दिनांक २६/०२/२०१६ रोजी ५.०० वाजेपर्यत |
| ३ | निवीदा प्रपत्र भरुन देण्याचे ठिकाण | :- | जिल्हा पुरवठा कार्यालय वर्धा |
| ४ | निवीदा उघडण्याचा दिनांक,वेळ व स्थळ ,(तांत्रिक लिफाफ अ-१ सर्व निवीदा धारकांच्या उपस्थितीत उघडण्यात येईल.तांत्रिक लिफाफ १ ची पुर्तता झाल्यानंतरच तांत्रिक लिफाफ २ उघडण्यात येईल) | :- | दिनांक २/३/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता |
| ५ | इसारा रक्कम | :- | रुपये २०,०००/निवीदे सोबत धनाकर्ष जिल्हाधिकारी ,वर्धा यांचे नांवे काढावा |

## बारदाणा विल्हेवाट निविदा सर्वसाधारण सुचना

१) सदर निवीदेची सविस्तर माहिती अटी व शर्तीसह निविदेचा अर्जाचा नमुना व दराचा तक्ता इत्यादीसहwww.wardha.nic.inया संकेतस्थळावर तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,वर्धा येथे दिनांक१२/०२/२०१६ पासून दिनांक२६ /०२ /२०१६ पर्येत कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन निवीदा संच उपलब्ध राहतील.

२) निवीदा अर्जाची किंमत रु.२००/- नापरतावा राहील. सदर रक्कम चलान व्दारे मुख्यलेखा शिर्ष ०४०८ अन्न व साठवण वखार ८०० इतर सकेतांक क्रमांक ०४०८०११३ या लेखशिर्ष खाली शासकिय खजिण्यात भरणा करुन मुळ चलानाची प्रत या कार्यालयात सादर केल्यानंतर निवीदा अर्ज व अटी पुरविण्यात येईल.

३) सदर निवीदा व्दि -लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. त्यामध्ये लिफाफा अ तांत्रीक लिफाफा ब दराचा लिफाफा राहील.

४) तांत्रिक लिफाफा अ मध्ये मागविण्यातआलेले सर्व कागदपत्र जोडणे बंधनकारक आहे. संबधित कागदपत्र न जोडल्यास निवीदा अपात्र ठरविण्यात येईल व दराचा लिफाफा उघडण्यात येणार नाही.
५) वर दर्शविलेला बारदाणा घ्यावयाचा असेल, अश्या इच्छुक खरेदीदारांनी मोहरबंद निवीदा जिल्हाधिकारी,वर्धा यांचे नावाने जिल्हा पुरवठा अधिकारी,वर्धा यांचे कार्यालयात दिनांक २४ /०२ /२०१६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत पाठवाव्यात किंवा समक्ष आणुन द्याव्यात ,विहीत प्रपत्रातील निवीदा स्विकारल्या जातील.दिनांक२/३/२०१६रोजी जिल्हाधिकारी,वर्धा किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकारी तसेच उपस्थित निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समोर दुपारी १.०० वाजता उघडण्यात येतील.उशिरा प्राप्त निविदा व अटी असलेल्या कोणत्याही निविदांचा विचार केला जाणार नाही. निविदा उघडण्याचे तारखेत व वेळेत आवश्यक वाटल्यास बदल केला जाईल ,अशा बदलाची कल्पना निविदाधारकास दिली जाईल.

६) निवीदाकारास बारदाण्यासाठी २०,०००/- ईसारा रक्कम collector,wardhaयांचे नावाने तयार केलेले राष्ट्रीयकृत बॅकचा दर्शनी हुंडी (Demand Draft) निविदेसोबत विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.ईसारा रकमेला व्याज देय राहणार नाही.
७) निवीदा पुर्णत:किंवा अंशत: स्विकृत करणे किंवा कोणतेही कारण न देता अशत: किंवा पुर्णत नामंजुर करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी,वर्धा यांनी राखुन ठेवलेले आहेत .

जिल्हाधिकारी,वर्धा

# निविदेमधील अटी व शर्ती

१) दर्शविलेल्या बारदानाचा साठा संबधित गोदामातुन ज्या स्थितीत आहे व ज्या ठिकाणी आहे तेथुन स्वखर्चाने उचलावा लागेल.कोणत्याही परिस्थितीत बारदाणा निवडुन घेता येणार नाही.

२) उपरोक्त निर्देशित दर्शविलेला बारदाणा निविदा धारकास संबंधित गोदामामध्ये कामाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

३) एखादा बारदाणा ही उपयोगी,निरुपयोगी किंवा कसे हे ठरविण्याचे अधिकार सबंधित तालुक्याचे तहसिलदाराना यांना राहील. या बाबतीत त्यांचा निर्णय अंतीम राहील,व त्यानुसार बारदानाची उचल करणे यशस्वी निविदाधारक राहील.

४) यशस्वी निविदाकाराने बारदानाची उचल केल्यानंतर त्यात नुकसान झाल्यास त्यांची जबाबदारी शासनाची राहणार नाही एकदा बारदान्याची उचल केल्यानंतर अथवा ताब्यात घेतल्या नंतर कोणत्याही कारणास्तव बारदाना परत घेतल्या जाणार नाही.

५) उपयोगी,निरुपयोगी व तुकडा बारदाना करिता एकच निविदा भरावी,दर नमुद करतांना उपयोगी,निरुपयोगी व तुकडा बारदाणा ,करिता प्रति नग नमुद निविदेत प्रसिध्द करण्यात आलेला हातचा दर विचाराता घ्यावा.त्यापेक्षा जास्तदर प्राप्त करण्यासाठी निविदाधारकाशी वाटाघाटी करण्यात येईल.

६)निविदासोबत २०,००० /-ईसाऱ्याची रक्कम जिल्हाधिकारी ,वर्धा यांच्या नावाने राष्ट्रीयकृत बॅंकेचे धनाकर्षव्दारे (डी.डी.व्दारे जमा करावे लागेल.

७) निविदा मंजुर होणाऱ्या निविदाधारकाय मंजुरी आदेश प्राप्त झाल्यापासुन सात दिवसाचे आत करारनामा मंजुर करुन दराच्या किंमतीच्या १० टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणुन कार्यालयात जमा करावी लागेल.सदर रक्कम भारतीय स्टेट बॅंक ट्रेझरी शाखा वर्धा येथे रोखीकृत होणारी असावी.

८)निविदेतील विचाराधीन दरानुसार बारदाना निहाय/निविदानिहाय बारदानाची किंमत परिगणीत केल्या नंतर येणारी रक्कम हि जिल्हाधिकारी,वर्धा यांचे वित्तीय अधिकारापेक्षा जास्त होत असल्यास निविदा मंजुरीचा प्रस्ताव मा.आयुक्त/शासनाकडे पाठविण्यात येईल.

९)कोणत्याही कारणास्तव रक्कम हप्ता पध्दतीने भरण्याची मुभा दिली जाणार नाही किंवा तशी विनंती यशस्वी निविदाकारास करता येणार नाही. पुर्ण रक्कमेचा भरणा केल्यानंतर व करारनामा केल्यानंतर बारदाना उचलीचे आदेश दिले जातील एकदा भरणा रक्कम कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

१०) वित्तीय अधिकारानुसार जर निविदा मंजुरीची बाब ही आयुक्त अथवा शासनाच्या अधिकार क्षेत्रातील असल्याचे किंवा इतर प्रशासकीय कारणाने आयुक्त /शासन स्तरावरुन निविदामंजुरीस विंलब झाला त्यादरम्यान बारदानाची प्रत खराब झाली तर यशस्वी निविदाकारांचे मंजुर दरात कपात केली जाणार नाही. मंजुर मुळ दरावर किंमत भरणा करावी लागेल. निविदा काढल्यापासुन ती मंजुर होईपर्यत उपरोक्त कारणाने होणाऱ्या विलंबामुळे त्या दरम्यान बारदानाची प्रत खराब झाली तरीही ती जबाबदारी शासनावर राहणार नाही.

११) निविदाकाराने निविदेमध्ये स्वत:चे .फर्मचे नांव,पत्ता,दुरध्वनी क्रमांक संस्था /फर्म असल्यास नोंदणी क्रमांक व पॅन कार्डव आयकर किंवा विक्रीकरदाता असल्यास तसे प्रमाणपत्र जोडावे.

१२) निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असतांना ऐनवेळी लादा दर येणाऱ्या निविदाकाराने निविदेतुन माघार घेल्यास अशा निविदाकाराची इसारा रक्कम सरकार जमा करण्यात येईल व अश्या प्रकरणी दुसऱ्यांनिवीदाकाराची निवीदा मंजुर करावी लागल्यास व त्यापासुन शासनाचे आर्थीक नुकसान झ ाल्यास अशा नुकसानाची वसुली पहिल्या निविदाकाराकडुन करण्यात येईल.

१३) निविदेतील अटी व शर्तीसंबंधी बारदाना उचलीबाबत करारनामा संबंधी काही वाद निर्माण झाल्यास प्रकरण अंतिम निर्णयासाठी शासनाव्दारे नियुक्त लवादाकडे सोपविण्यात येईल व अश्या प्रकरणी लवादाचा निर्णय अंतीम राहील आणि तो यशस्वी निविदाकारास सोपविण्यात बंधनकारक राहील लवादाच्या निर्णय आधी यशस्वी निविदाकारास उक्त वाद प्रकरणी दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

१४)निविदेत कोणतीही अट नसावी ,अट असलेली निविदा किंवा अर्धवट निविदा नाकारण्यात येईल कोणतीही निविदा मंजुर करण्याच अथवा नाकारण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी यांना व प्रकरण परत्वेआयुक्त ,शासनाने राखुन ठेवलेले आहेत.

१५)निविदा उघडणे वेळी निविदा धारकास अथवा त्याचे प्रतिनिधीस उपस्थित राहता येईल.

१६)निविदा दिनांक २६ /०२/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत स्विकारण्यात येतील व दिनांक २/०३/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता मा.जिल्हाधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

१७) तंत्रिक लिफाफा मध्ये आवशक कागदपत्रांची पुर्तता करणाऱ्या निविदाकारांचाच ब दराचा लिफाफा उघडण्यात येईल.